**ठळक बातम्या**

- राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी प्रचाराला जोर
- बिनविरोध निवड झालेल्या ठिकाणी पुन्हा निवडणूक घ्यावी अशी उद्धव ठाकरे यांची मागणी
- भारतीय कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या २५ पिकांच्या १८४ सुधारित वाणांचं केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण
- राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते वाराणसीत उद्घाटन

**आणि**

- ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी प्रचाराला जोरदार सुरुवात झाली आहे.

महानगरपालिका निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून गेल्याबद्दल विरोधी पक्षांनी न्यायालयात धाव घेतली तरी जनादेश महायुतीच्या बाजूनेच असेल असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. बिनविरोध निवडीला न्यायालयात आव्हान दिलं जाईल, असं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने काल म्हटलं होतं, त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी हे विधान केलं. ते चंद्रपूर मधे प्रचार रॅलीत वार्ताहरांशी बोलत होते. विरोधक न्यायालयात जाऊ शकतात, मात्र आपल्याला जनतेने निवडलं आहे याचा पुनरूच्चार मुख्यमंत्र्यांनी केला.  तसंच अनेक अपक्ष मुस्लीम धर्मिय उमेदवार देखील बिनविरोध निवडून आल्याचा दावा केला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी अमरावती इथं रोड शो केला तसंच अकोला इथं प्रचारसभा घेतली. केंद्र सरकारने कोट्यवधी रुपयांचा निधी शहरांच्या विकासासाठी उपलब्ध करून दिल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**विकसित** महाराष्ट्रासाठी जनता महायुतीला मतदान करेल असा विश्वास भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ते नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते.  मुंबईतली

विकासामं देवेंद्र फडनवीस यांच्या नेतृत्वाखाली झाली असून त्याच्याशी उद्धव ठाकरे यांचा संबंध नाही असं ते म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर केलेल्या टीकेवर बोलताना याचा महायुतीच्या स्थैर्यावर कोणताही परिणाम होणार नाही असंही बावनकुळे म्हणाले.

**सोलापुरातले** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांची काही दिवसांपूर्वी हत्या झाली. त्यांच्या कुटुंबियांची मनसे नेते अमित ठाकरे यांनी आज भेट घेतली. याप्रकरणी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सरवदे यांना न्याय मिळवून देण्याची विनंती करणार असल्याचं ठाकरे यांनी सांगितलं. तसंच निवडणुका जिंकण्यासाठी असं टोकाचं पाऊल कुणी उचलू नये असंही ते म्हणाले.

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारांना प्रचारकार्यासाठी निवडणूक कक्षाची परवानगी घेणं आवश्यक आहे, त्यानुसार आयुक्त नवलकिशोर राम यांनी आज एक खिडकी परवानगी कक्षाचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचा जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. राज आणि उद्धव ठाकरे यांनी मुंबईत शिवसेना भवन इथं जाहीरनामा प्रसिद्ध करत वार्ताहरांशी संवाद साधला. राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या बिनविरोध निवडणुकीला यावेळी दोन्ही नेत्यांनी विरोध केला. बिनविरोध निवडणूक होणं हा लोकशाहीचा आणि लोकांचा अपमान आहे, मतदारांना मतदानापासून वंचित ठेवलं जात असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. ज्या ठिकाणी विरोधी उमेदवार नाहीत तिथली प्रक्रिया रद्द करून पुन्हा एकदा निवडणूक प्रक्रिया राबवावी  अशी मागणी त्यांनी केली.

**होल्ड बाईट उद्धव**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर असूनही विरोधकांना दमदाटी करत आहेत, सत्ताधारी पक्षाचा प्रचार करत आहेत, त्यामुळे त्यांना निलंबित करावं अशी मागणीही उद्धव ठाकरे यांनी केली.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही बिनविरोध निवडीला विरोध केला. भाजपा चुकीचे पायंडे पाडत असून जनतेनं याचा विचार करायला हवा असं ते म्हणाले.

**ठाणे** महानगरपालिकेतही विरोधी पक्षाच्या उमेदवारांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप माजी खासदार राजन विचारे आणि मनसे नेते अविनाश जाधव यांनी केला. तसंच **पुण्य़ासह** विविध महानगरपालिकांमधे मोठ्या प्रमाणात पैसे देऊन महायुतीने उमेदवार बिनविरोध निवडून आणल्याचा आरोप आम आदमी पक्षानं केला आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या माजी महापौर आणि शिव आरोग्य सेनेच्या अध्यक्ष शुभा राऊळ यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा राजीनामा दिला.

**<><><><><>**

नाशिक महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारांना तिकीट वाटपावरून झालेला प्रकार चुकीचा असून निवडणुका झाल्यानंतर दोषींवर कारवाई करू असं भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी म्हटलं आहे. ते नाशिक इथं वार्ताहरांशी बोलत होते. महानगरपालिकेसाठी उमेदवारी देण्यासाठी भाजपा नेत्यांकडून पैशाची मागणी केल्याचा आरोप काही जणांनी केला होता, यावर आरोप करणाऱ्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून गैरसमज दूर करू असं चव्हाण म्हणाले.

**<><><><><>**

२०२५ या वर्षात देशात १५ कोटी टनांपेक्षा जास्त तांदूळ उत्पादन झाल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. ICAR, अर्थात भारतीय कृषी संशोधन परिषदेनं विकसित केलेल्या २५ पिकांच्या १८४ सुधारित वाणांचं शिवराजसिंह यांनी आज लोकार्पण केलं. त्यावेळी ते बोलत होते. तांदूळ उत्पादनात भारतानं चीनला मागे टाकलं असून, भारत हा जगातला आघाडीचा तांदूळ निर्यातदार देश बनल्याचं ते यावेळी म्हणाले.
शेतकऱ्यांना रास्त भावात दर्जेदार बियाणं उपलब्ध व्हावं, हे सरकारचं ध्येय आहे. त्या अनुषंगानं गेल्या काही वर्षांमध्ये देशात बियाण्यांचं ३२ शे पेक्षा जास्त वाण विकसित करण्यात आलं असून, ते शेतकऱ्यांपर्यंत लवकरात लवकर पोहोचवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

विकसित भारत जी रामजी योजना पूर्वीच्या मनरेगा योजनेच्या तुलनेत अधिक पारदर्शक आणि कल्याणकारी असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान आंनी आज सांगितलं. या योजनेबद्दल काँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. मनरेगा योजनेसाठी प्रचंड आर्थिक तरतूद करुनही त्यातून दीर्घकालीन विकासाचं काम होऊ शकलं नाही, कारण त्यात भ्रष्टाचार होता असं ते म्हणाले. पूर्वीच्या योजनेपेक्षा जास्त दिवस काम देण्याची तरतूद जीरामजीमधे आहे, तसंच काम देता आलं नाही तर बेरोजगारी भत्ता देण्याची किंवा कामाचे पैसे वेळेवर दिले नाहीत तर अधिकाऱ्यांना दंड करण्याची तरतूदही नव्या योजनेत आहे, अशी माहिती त्यांनी दिली. नव्या योजनेनं ग्राम सभा आणि ग्रामपंचायतीला जास्त अधिकार दिले आहेत असं ते म्हणाले. काँग्रेसने हा फरक समजून घ्यावा आणि संभ्रम निर्माण करणं थांबवावं असं आवाहन त्यांनी केलं,.....

- **- होल्ड- बाईट- शिवराज सिंग चौहान - -**

नव्या जीरामजी योजनेबद्दल कोल्हापूर जिल्ह्यातल्या हातकणंगले तालुक्यातल्या अंबप गावच्या सरपंच दीप्ती माने यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रीया दिली…

**- होल्ड बाईट दीप्ती माने - २२ सेकंद- -**

**<><><><><>**

सन २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकचं यजमानपद मिळवण्याकरता भारत जोरदार प्रयत्न करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. उत्तर प्रदेशात वाराणसी इथं होत असलेल्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं उद्घाटन त्यांनी आज दूरस्थ पद्धतीनं केलं, त्यावेळी ते बोलत होते. विविध खेळांमध्ये २०१४ सालापासून देशाची कामगिरी सातत्यानं सुधारत असून ‘जेन झी’ची तरुण पिढी हातात तिरंगा घेऊन भारताचं प्रतिनिधित्व करताना पाहून देशाचा उर अभिमानानं भरून येतो. प्रत्येकाला आपापल्या भूमिका निभावतानाच त्यांच्या जबाबदाऱ्याही पार पाडायच्या असतात. मात्र, जेव्हा प्रत्येकजण आपापल्या जबाबदाऱ्या गांभीर्यानं पार पाडतो, तेव्हाच यशाचं शिखर गाठता येतं. देशाचा प्रवासही याच दिशेनं होत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

सातारा इथं आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप आज झाला. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त गुजराती लेखक रघुवीर चौधरी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे

होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यक्रमाला उपस्थित होते. मराठी भाषेच्या संवर्धन जतनासाठी कधीही निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली. मराठी पुस्तकांच्या दुकानांसाठी एस टी महामंडळाच्या आवारात ५० टक्के सवलतीच्या दरात जागा उपलब्ध करुन देण्याचा, तसंच अत्याधुनिक  ग्रंथालयं उभारण्याचा निर्णय लौकरच होईल, असं आश्वासन शिंदे यांनी दिलं.

माध्यमकर्मींनी त्यांचं काम चोखपणे केलं नाही तर त्यांची गरजच उरणार नाही, असं स्पष्ट मत ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक गिरीश कुबेर यांनी आज या संमेलनातल्या विशेष मुलाखतीत व्यक्त केलं. भूमिका न घेणं हे सडू लागलेल्या समाजाचं लक्षण आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**